# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** धानोरा **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0028 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/04/2019 23:32 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 07/03/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/04/2019
**Time From (वेळेपासून):** 07:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/04/2019 **Time (वेळ):** 23:19 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 034 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/04/2019 23:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिपबांधकाम विभाग धानोरा,धानोरा

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** शिवकुमार रामाजी वट्टी

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1986 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पवनी,धानोरा,धानोरा ,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पवनी,धानोरा,धानोरा ,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हिम्मतलाल जेठालाल रुपारेल | | | 1. जि प विभाग धानोरा ,धानोरा ,धानोरा , गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 चे 12 नोटा | 6,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 6,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्यादिनांक 02/04/2019मी श्री षिवकुमार रामाजी वट्टी, वय 33 वर्षे, जात-गांेड(एस.टी.) धंदा- बेरोजगार अभियंता(कंत्राटदार), रा. मु. पवनी, ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली. ह.मु: ब्ध्व् जनार्धन वड्डे, वार्ड क्रं. 1 विद्या नगर, ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली. मो. नं. 9404826292.मी दिनांक 06/03/2019 रोजी पोलीस निरीक्षक श्री रवि गोपाळराव राजुलवार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. मी वरील पत्यावर राहत असून बेरोजगार अभियंता असल्याने मला ग्रामपंचायत सालेभट्टी अंतर्गत सोमा कातलु वट्टी ते मुख्य रस्त्यापर्यंत सि.सि. रोडचे बांधकामाचे कंत्राट मिळाल्याने मी कंत्राटदार म्हणुन काम करत आहे. सन 2016-2017 च्या खासदार स्थानिक विकास निधीमधुन मौजा सालेभट्टी ग्रामपंचायतीअंतर्गत सोमा कातलु वट्टी ते मुख्य रस्त्यापर्यंत सिमेंट कांक्रेट रोड बांधकामाचे कंत्राट मला जिल्हा परिषद बांधकाम विभाग, गडचिरोली येथुन सदर बांधकाम सुरू करण्याबाबतचे वर्क आर्डर करारनामा क्रं. बी-1/110/2017-2018 जा.क्रं. बां.वि. निवीदा/3749/2017 कार्यालय कार्यकारी अभियंता (बांध.) जि.प. गडचिरोली. दि. 19/12/2017 अन्वये ग्रामपंचायत सालेभट्टी यांचेकडुन प्राप्त झाल्याने सदरचे सिमेंट कांक्रेट रोड बांधकाम सुरूवात करून मी दिनांक 28/12/2017 रोजी पुर्ण केले. त्यानंतर केलेल्या कामकाजाचे मोजमाप रू.3,04,000/- चे बिल मोजमाप पुस्तिका व इस्टीमेटप्रमाणे सादर केलेले असुन त्यापैकी रू.2,00,000/- चे बिल मला मिळालेले आहे. उर्वरित रू. 1,04,000/- चे सिमेंट कांक्रेट रोड बांधकामाचे बिल मिळणे बाकी असल्याने मी जिल्हा परिषद गडचिरोली येथे सातत्याने पाठपुरावा करित आहे. आज दिनांक 06/03/2019 रोजी श्री रूपारेल, उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, गडचिरोली यांचेकडे कार्यालयात जावुन भेट घेतली असता ते मला म्हणाले कि, मौजा सालेभट्टी ग्रामपंचायतीअंतर्गत सोमा कातलु वट्टी ते मुख्य रस्त्यापर्यंत सिमेंट कांक्रेट रोड बांधकामाचे बिल रू.3,04,000/- असुन त्या कामाचे 2 टक्क्याप्रमाणे रू.6,000/- होतात. तेवढे रू. 6,000/- मला द्यावेच लागतील. तेव्हाच मी उर्वरित रू.1,04,000/- च्या बिलावर व एम.बि. वर सही करून देतो. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना म्हणालो कि, साहेब आता माझेकडे एवढी रक्कम नाही. पैसे जमल्यानंतर मी तुम्हाला येवुन भेटतो. असे म्हणुन निघुन आलो.श्री रूपारेल, उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, गडचिरोली हयांनी मौजा सालेभट्टी ग्रामपंचायतीअंतर्गत सोमा कातलु वट्टी ते मुख्य रस्त्यापर्यंत सिमेंट कांक्रेट रोड बांधकामाचे बिल रू. 3,04,000/- असुन त्या कामाचे उर्वरित रू.1,04,000/- च्या बिलावर व एम.बि. वर सही करून देतो या कामाकरीता 2 टक्क्याप्रमाणे रू.6,000/- (सहा हजार रूपये) लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री रूपारेल, उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, गडचिरोली यांना रू.6,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी रू.6,000/- रक्कम सोबत

घेवुन आपल्या कार्यालयामार्फत कार्यवाही होणेकरिता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो आहे.श्री रूपारेल, उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, गडचिरोली यांचेषी माझा कोणताही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. मी सोबत आणलेले रु.6,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री राजुलवार यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हाईस रेकार्डर कष्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकार्डरद्वारे रेकार्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 6,000/- (रू.500/- दराच्या 12 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अथ्रसिन पावडर लावली. मला लाचलुचपत कार्यालयात येण्यास संध्याकाळ झाल्यामुळे तसेच मला उदयीक रोजी रूपारेल साहेबांनी त्यांच्या गडचिरोली येथील घरी बोलाविलेले असल्यामुळे उद्या दि.07/03/2019 रोजी पुढील लाच मागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी मला घरी जाण्यास सांगुन दि.07/03/2019 रोजी सकाळी लवकरच ला.प्र.वि. कार्यालय गडचिरोली येथे येण्याच्या सुचना दिल्या. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.त्यानंतर दि. 07/03/2019 रोजी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हाईस रेकार्डर सुरू करून व्हाईस रेकार्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकार्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री रूपारेल साहेब, उपविभागीय अभियंता, उपविभाग धानोरा, जिल्हा परिशद गडचिरां◌ेली यांच्या राहत्या घरी काम्प्लेक्स येथे जाण्यास रवाना केले. श्री रूपारेल साहेबांच्या घरी पंच क्रं. 1 समक्ष श्री हिम्मतलाल रूपारेल साहेबांनी माझेकडे सन 2016-2017 च्या खासदार निधीमधुन मौजा सालेभट्टी ग्रामपंचायतीअंतर्गत सोमा कातलु वट्टी ते मुख्य रस्त्यापर्यंत सिमेंट कांक्रेट रोड बांधकामाचे एकुण बिल रू. 3,04,000/- मधील उर्वरित रू.1,04,000/- च्या बिलावर व एम.बि.वर सही करून देण्याच्या कामाकरिता 2 टक्क्याप्रमाणे रू. 6,000/- लाच रकमेची मागणी करून मोजमाप पुर्ण केल्यानंतर आज रोजी दुपारनंतर धानोरा येथील कार्यालयात लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत गेलो असता पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आला.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हाईस रेकार्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण लोकसेवक श्री रूपारेल साहेब, उपविभागीय अभियंता, उपविभाग धानोरा, जिल्हा परिशद गडचिरां◌ेली यांनी माझेकडे सिमेंट कांक्रेट रोड बांधकामाचे एकुण बिल रू.3,04,000/- मधील उर्वरित रू.1,04,000/- च्या बिलावर व एम.बि.वर सही करून देण्याच्या कामाकरिता 2 टक्क्याप्रमाणे रू. 6,000/- लाच रकमेची मागणी करून मोजमाप पुर्ण केल्यानंतर आज रोजी दुपारनंतर धानोरा येथील कार्यालयात लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविल्याची खात्री केली. त्यावरून लोकसेवक उपविभागीय अभियंता श्री हिम्मतलाल रूपारेल यांचेविरूद्ध दि. 07/03/2019 रोजी दुपारी पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. परंतु त्यादिवषी माझे कामाचे मोजमाप न झाल्याने मी तेव्हा त्यांना पैसे दिले नाही. तेव्हा त्यांनी मला कामकाज पुर्ण झाल्यावरच पैसे देषील असेही सांगीतले. त्यामुळे जेव्हा श्री रूपारेल साहेबांकडुन एम.बी. वर सहया झाल्याचे काम पुर्ण झाल्याबाबत माहीती मिळेल त्यादिवषी पुढील लाच सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी मला घरी जाण्यास सांगुन जेव्हा बोलाविण्यात येईल तेव्हा ला.प्र.वि. कार्यालय गडचिरोली येथे येण्याच्या सुचना दिल्या. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.काल दि. 01/04/2019 रोजी माझे परिचित श्री नरेंद्र भैसारे यांच्या मोबाईल क्रं. 9405635116 वरून माझा मोबाईल क्रं. 9404826292 यावर काल आला. त्यांनी मला सांगीतले, तुझे एम.बी.वर सहया झालेल्या आहेत. तुला रूपारेल साहेबांनी माझेकडे रू.7,000/- देण्यास सांगीतले. तुझी एम.बी. माझेकडे आहे. पैसे दिल्याषिवाय तुला एम.बी. द्यायची नाही. असे त्यांनी मला सांगुन ठेवले आहे. असे मला माहीती पडल्यामुळे मी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांना याबाबत सविस्तर माहीती दिली. दि.01/04/2019 रोजी संध्याकाळ झालेली असल्यामुळे व पंचांना बोलाविणे आवष्यक असल्यामुळे उद्या दि.02/04/2019 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. आज दि.02/04/2019 रोजी मी काल ठरल्याप्रमाणे जिल्हा परिशद माध्यमिक षाळेच्या आवारातील गटसाधन केंद्राचे आडोष्याला हजर असतांना लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील षासकिय पंच, स्टाफ षासकिय वाहनाने धानोरा जिल्हा परिशद षाळेच्या मैदानात आले. त्यावेळी मला पंचासमक्ष अथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे पंटच्या उजव्या खिष्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर खांद्यावरील दुपट्टा काढुन 2 वेळा झटकुन चेहरा पुसुन इषारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इषारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगे हाथ पकडतील असे सांगण्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हाईस रेकार्डर सुरू करून व्हाईस रेकार्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकार्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह पायीपायी जिल्हा परिशद उपविभाग बांधकाम कार्यालय, धानोरा, जिल्हा गडचिरां◌ेली येथे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 जिल्हा परिशद उपविभाग बांधकाम कार्यालयाच्या आत गेलो असता त्याठिकाणी उपविभागीय अभियंता श्री हिम्मतलाल रूपारेल हे आपल्या कक्षात हजर होते. त्यांचेषी बोलणी दरम्यान त्यांनी मला सांगीतले कि, तुमचं एम.बी. नरेंद्र भैसारें यांच्याकडे दिलेली आहे. तुम्ही त्यांच्याषी बोलुन घ्या. त्यामुळे मी श्री नरं◌ेद्र भैसारे यांना बोललो असता त्यांनी मला सांगीतले कि, रूपारेल साहेबांनी तुमच्या कामाची एम.बी. माझेकडे दिलेली आहे. त्याचे रू.7,000/- द्यायला सांगीतले. यावर मी त्यांना म्हणालो कि, साहेबांनी या कामासाठी फक्त रू.6,000/- मागीतलेले आहेत. ते म्हणाले, ठिक आहे. देवुन द्या. यावर मी श्री रूपारेल साहेबांच्या सांगण्यावरून अथ्रसिन पावडर लावलेल्या रू.6,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या उजव्या खिष्यातुन काढुन मी श्री नरेंद्र भैसारे यांना दिल्या असता त्यांनी लाच रक्कम रू.6,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी मोजत असताना त्यावेळी मी पंच क्रं. 1 सोबत दर्षनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे खांद्यावरील दुपट्टा काढुन 2 वेळा झटकुन चेहरा पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इषारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री नरेंद्र भैसारे यांना रंगेहात पकडले त्याचवेळी कार्यालयात हजर असलेले उपविभागीय अभियंता श्री हिम्मतलाल रूपारेल यांनाही पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक श्री हिम्मतलाल जेठालाल रूपारेल, वय 54 वर्षे, शाखा अभियंता, प्रभार - उपविभागीय अभियंता, जिल्हा परिशद

गडचिरोली रा. कॉम्प्लेक्स, रिक्रीऐशन हॉलच्या बाजुला, मु.पो.ता.जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मला मौजा सालेभट्टी ग्रामपंचायतीअंतर्गत सोमा कातलु वट्टी ते मुख्य रस्त्यापर्यंत सिमेंट कॉंक्रेट रोड बांधकामाचे बिल रू. ३,०४,०००/– असुन त्या कामाचे उर्वरित रू.१,०४,०००/– च्या बिलावर व एम.बि. वर सही करून देतो या कामाकरीता २ टक्क्याप्रमाणे रू.६,०००/– (सहा हजार रूपये) लाच रक्कमेची मागणी केली. तसेच खाजगी इसम नामे श्री नरेंद्र रेमाजी भैसारे, वय ४६ वर्षे, रा. इंदीरा नगर, प्रभाग ३; धानोरा, जि. गडचिरोली यांच्या हस्ते माझेकडुन पंचासमक्ष रू.६,०००/– लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे himmatrao aanna **Rank (पद):** SI (Sub-Inspector)
**No.(क्र.):** 15101000402has **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): vivek baburao ahire
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pbmh64160

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)